# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाईन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

या पृथ्वीवर अनेक देश आहेत. त्यातील एक म्हणजे भारत. भारत हा अनेक देशांपैकी एक असला तरी तो माझा देश आहे. त्याला, केवळ भूगोलामध्ये स्थान नाही तर त्याला एक इतिहास आहे. संस्कृती आहे. माझा भारत अतिशय प्राचीन देश आहे. माझ्या देशाचे वर्णन करायचे झाल्यात "सुजलां सुफलां..." या भाषेत करता येईल. उत्तरेला हिमालय मुकुटाप्रमाणे शोभतो आहे शिवाय तो शत्रूचे आक्रमण थोपवून धरतो. दक्षिणेला तिन्ही बाजूनी सागराने त्याला जणू प्रेमाने कवटाळले आहे. माझ्या भारताच्या अंगाखांदयावर अनेक नदया खेळत आहेत. कुठे बारा महिने हिरवीगार वनश्री तर कुठे वाळवंट पसरले आहे. कुठे बर्फवृष्टी तर कुठे उबदार हवा. अशी विविधता माझ्या देशात दिसून येते. अनेक धर्म, जाती आणि पंथाचे लोक माझ्या देशात एकोप्याने राहतात. अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक पंथ असूनही आम्ही सारे भारतीय आहोत हा प्रत्येकाच्या हृदयातील मंत्र आहे.

माझ्या भारतात अनेक संत होऊन गेले. त्याचबरोबर शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्तेही. आजही माझ्या देशात संत, शास्त्रज्ञ आणि विद्वान सर्वत्र आढळतात. भारतभर अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. मंदिरे आणि ऐतिहासिक ठिकाणे आपला इतिहास आणि संस्कृतीची जणू गाथा गात आहेत. निसर्गरम्य ठिकाणेही पर्यटनासाठी सर्वांना आकर्षित करतात. परदेशी प्रवासी पुरातन काळापासून भारताचे दर्शन घेणयासाठी येत असतात. माझ्या देशातील अनेक तत्त्ववेत्त्वाना भारतीय संस्कृती आणि विचार जगभर पोहोचवले आहेत. माझ्या देशातील माणसे, निसर्ग, संस्कृति आणि विचार यांचा मला अभिमान वाटतो. कारण भारत माझा देश आहे.

---